# कोल्हापूरकरांनी अनुभवले खंडग्रास सूर्यग्रहण!



कोल्हापूर : अत्याधुनिक टेलिस्कोपीच्या सहायाने खंडग्रास सूर्यग्रहण पाहताना खगोलप्रेमी.

## खंडग्रास सूर्यग्रहणाची दृश्ये सोशल मीडियावर व्हायरल

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूरमध्ये खंडग्रास पध्दतीच्या सूर्यग्रहणाला १० वाजून ३ मिनिटांनी सुरुवात झाली. ११ वाजून ३९ मिनिटांनी सूर्यग्रहणाचे दर्शन झाले. सूर्यग्रहण सुटताना ढग बाजूला झाल्याने जिल्ह्यातील खगोलप्रेमींना खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याची पर्वणीच मिळाली. दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी खंडग्रास सूर्यग्रहण सुटले. ग्रहणाचा कालावधी ३ तास २५ मिनिटे व ३१ सेकंद इतका होता. टेलिस्कोपच्या सहाय्याने खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याचा उत्साह खगोलप्रेमींच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

संपूर्ण महाराष्ट्रात खंडग्रास सूर्यग्रहण तर देहरादूनमध्ये कंकनाकृती सूर्यग्रहणाचे दर्शन झाले. गतवर्षी केरळमधील पायणूर शहरात कंकणाकृती सूर्यग्रहण दिसले होते. आता २०३४ म्हणजेच तब्बल १४ वर्षांनी कंकनाकृती सूर्यग्रहण दिसणार आहे. शिवाजी विद्यापीठाने पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याची व्यवस्था केली होती. शहरात विवेकानंद कॉलेज, खगोलप्रेमी वसंत गुंडाळे यांच्यासह शहरातील अनेक कुटुंबियांनी आपआपल्या घराच्या छतावरून खंडग्रास सूर्यग्रहण पाहिले. खगोलप्रेमींनी खंडग्रास सूर्यग्रहणाची विविध दृश्ये कॅमेराबध्द करून सोशल मिडीयावर शेअर केली आहेत. ग्रहण सुटल्यानंतर आंघोळीसाठी गर्दी होऊ नये म्हणून पंचगंगा नदीवर अग्निशमन दलाचे जवान व पोलीस बंदोबस्त होता.

इस्रोने दिलेल्या इंडियन नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम (आयआरएनएसएस/नाविक) या उपकरणाच्या सहाय्याने सूर्यग्रहण काळात आवकाशात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणार असल्याचे शिवाजी विद्यपीठ, अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले.

### पुढील तीनही ग्रहण भारतात दिसणार नाहीत

विवेकानंद महाविद्यालयात अत्याधुनिक दुर्बिनीच्या माध्यमातून खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याची व्यवस्था केली होती. यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. या वर्षातील ५ जुलै रोजी सकाळी छायाकल्प चंद्रग्रहण तर ३० नोव्हेंबर रोजी दुपारी चंद्रग्रहण आणि १४ डिसेंबर रोजी रात्री सूर्यग्रहण आहे. त्यामुळे भारतात यापुढील तिनही ग्रहण दिसणार नाहीत.

**डॉ. मिलिंद कारंजकर (विवेकानंद कॉलेज)**

RSB / SDS EDIT-8/IND

तरुण भारत Mon, 22 June 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52916859

# चीनचा डिजिटल युद्धज्वर

डॉ. शिवाजी जाधव



चीनने भारताच्या विरोधात षड्यंत्र रचले आहे. तेथील सरकारी वृत्तपत्रे, टीव्ही वाहिन्या तसेच सोशल मीडिया या षड्यंत्राचा एक भाग आहेत. सोशल मीडियाचा वापर करून चीन आपल्या नागरिकांमध्ये भारताच्या विरोधात जनमत तयार करत आहे. अनेक फेक न्यूज बिनदिक्कतपणे व्हायरल केल्या जात आहेत. भारतीयांनी उत्स्फूर्तपणे चिनी वस्तूंवर टाकलेल्या बहिष्काराची चीनमधील सोशल मीडियातून खिल्ली उडवली जात आहे. विविध माध्यमांचा उपयोग करून चिनी सरकार भारतविरोधातील आपल्या अजेंड्याला तेथील नागरिकांचा यानिमित्ताने पाठिंबा मिळवताना दिसत आहे.

भारत आणि चीन या जगातील दोन महत्त्वाच्या बलाढ्य देशांत सध्या तणाव आहे. चीनच्या भ्याड हल्ल्यात भारतीय जवान शहीद झाल्यानंतर चीनविषयी इथल्या जनमनांत असंतोष आहे. दोन्ही देशांतील माध्यमे आपापल्या धोरणानुसार उभय देशांतील तणावाचे वार्तांकन करताना दिसत आहेत; पण त्यात खूपच फरक आहे. दोन्ही देशांतील सोशल मीडियाही परस्परांविरोधात रान पेटवताना दिसतो. भारतीयांविषयी चिनी नागरिकांच्या मनात चीड निर्माण व्हावी, अशी व्यवस्था चीनच्या सोशल मीडियाने केली आहे. माध्यमांच्या जागतिक प्रभावापासून चीनने स्वतःला जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. त्यामुळे चीनमधील घडामोडींची तितकीशी माहिती उपलब्ध होत नाही. याचा अर्थ चीनमध्ये सर्व काही ठीकठाक आहे, असा होत नाही. चिनी माध्यमे व्यवस्था, सरकार पुरस्कृत किंवा सरकारधार्जिणी आहेत. त्यामुळे सरकारी धोरणांची पाठराखण करण्यापलीकडे या माध्यमांचे वेगळे अस्तित्व जाणवत नाही.

चीनने स्वतःचे माध्यम धोरण तयार केले. जगातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेल्या या देशात 'गुगल'ला थारा नाही. भारतात गुगलशिवाय आपले पान हलत नाही; परंतु चीनने ठरवून गुगलला दूर ठेवले आहे. चीनमध्ये २०१९ च्या आकडेवारीनुसार, ८७ कोटी ४० लाखांच्या आसपास इंटरनेट वापरकर्ते आहेत. विशेष म्हणजे चीनमध्ये इंटरनेट वाढीचा वेग मंदावला आहे. २०१८ मध्ये तो ६.९ टक्के होता. २०१९ मध्ये त्यात घट होऊन हाच वेग ६.१ टक्क्यांवर आला आहे. गुगलला टक्कर देण्यासाठी चीनने 'बायडू' नावाने सर्च इंजिन सुरू केले. रॉबिन ली यांनी २००० मध्ये सुरू केलेल्या या सर्च इंजिनला चीनमध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. सध्या एकूण इंटरनेट वापरकर्त्यांपैकी ७२ टक्के वापरकर्ते माहिती शोधण्यासाठी 'बायडू'चा वापर करतात. यावरून या सर्च इंजिनचे महत्त्व लक्षात येते. याशिवाय 'सोगोयू', 'सो यॉट कॉम', 'युयाओ' अशी काही सर्च इंजिन आहेत; परंतु त्यांचा प्रभाव कमी आहे. गुगलची एकाधिकारशाही मोडून काढण्यासाठी चीनने ही पर्यायी व्यवस्था केली. पाश्चात्त्य धाटणीच्या प्रसारमाध्यमांतून आलेला आशय सांस्कृतिक भेसळ करतो, याची जाणीव असल्याने चीनने गुगलसह इंटरनेटवरून मुक्तपणे येणाऱ्या आशयाच्या भोवती आपल्यापुरती भिंत बांधली. ही भिंत बांधत असतानाच देशांतर्गत माहिती व्यवस्था बळकट करण्यावर भर दिला. यातून चीनमध्ये स्वतःचे इंटरनेट व्यवस्था आणि माहिती प्रणाली उदयास आली.

चीनमध्ये सोशल मीडियाचीसुद्धा पर्यायी व्यवस्था आहे. गुगलला संधी नसल्याने आपसूकच गुगलसोबत असलेली सर्व उपमाध्यमे चीनमध्ये शिरकाव करू शकली नाहीत. फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर आदी माध्यमांची चीनमध्ये चलती नाही; परंतु चीनने सोशल नेटवर्किंगची गरज भागवण्यासाठी पर्यायी माध्यमे उभारली. 'वी चॅट' ही चीनमधील सर्वाधिक लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट आहे. ती बहुउद्देशीय असून, संदेश, नेटवर्किंग आणि मोबाईल पेमेंटसाठी याचा वापर केला जातो. 'सुपर ॲप' म्हणूनही ते चीनमध्ये ओळखले जाते. 'सीना वायबो' हा चीनमध्ये ट्विटरला पर्याय म्हणून वापरला जातो. अनेक सरकारी निर्णय या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविले जातात. 'टेनसेंट क्यू क्यू'चा वापर इन्टंट मेसेजिंगसाठी केला जातो. 'ट्यूयुकू' हे चीनमधील यू-ट्यूब आहे. प्रत्येक युजर्सची गरज भागवत असताना स्थानिक भाषेचाच वापर होईल, याकडे चीनने कटाक्षाने पाहिले. 'चायना डेली', 'ग्लोबल टाइम्स'सारखी वृत्तपत्रे आणि 'चायना ग्लोबल टेलिव्हजन नेटवर्क' (सीजीटीएन)सारखी टीव्ही माध्यमे सरकारी धोरणाचा जोमाने पुरस्कार करतात. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच वेब माध्यमांवर सरकारचे नियंत्रण आहे. त्यामुळे सरकारला अनुकूल असणारी माहिती बातमी म्हणून नागरिकांपर्यंत पोहोचते. भारताशी तणातणी झाल्यानंतर चीनमधील विविध माध्यमांनी एकतर्फी वृत्तांकन केले. तर सोशल मीडियानेही दिशाभूल करणारी माहिती रेटून गोंधळ उडवून दिला. प्रत्येक वेळी माध्यमात सरकारचा हस्तक्षेप दिसून आला.



भारत आणि चीन या दोन्ही देशांत राजकीय, लष्करी, व्यूहात्मक तसेच कूटनीतीच्या पातळीवर मतभेद असलेल्या मुद्यांची हाताळणी सुरू आहे; परंतु याबरोबरच दोन्ही देशांतील सोशल मीडिया जनमत निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारत आणि चीनमध्ये सीमेवर कुरबुरी होताच चीनचा सोशल मीडिया खवळला. भारताच्या विरोधात चीनमध्ये सोशल मीडियातून मोहीम उघडण्यात आली. भारताविषयीच्या नकारात्मक पोस्ट व्हायरल करून भारताला सातत्याने कमीपणा येईल, अशी मांडणी करण्यात येत आहे. 'सीना वायबो'च्या माध्यमातून भारताच्या विरोधात विखारी प्रचार करण्यात येत आहे. गरिबांचा देश अशी भारताची संभावना केली जात आहे. काही व्हिडिओ व्हायरल करून भारताची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न चीनच्या सोशल मीडियातून होत आहे. भारतात चिनी वस्तूंच्या विरोधात आंदोलन उभे राहिले आहे. चिनी मालाचा बहिष्कार करण्यासाठी नागरिक स्वतःहून पुढाकार घेत आहेत. याचा संदर्भ घेत चीनमधील सोशल मीडियातून भारताच्या 'मेक इन इंडिया' प्रोजेक्टची खिल्ली उडवली जात आहे. चिनी वस्तूंशिवाय भारताला पर्याय नाही, असा संदेश देण्याचा प्रयत्न ही माध्यमे करत आहेत.

चीन सरकारची बाजू मांडण्याची 'ग्लोबल टाइम्स'ने बरीच शक्ती खर्ची पाडली. भारताच्या विरोधात चीनमधील नागरिकांचे जनमत तयार करण्याचे कामही या वृत्तपत्राने केले. सीमेवर चकमक होऊन भारतीय जवान शहीद झाल्यानंतरही या वृत्तपत्राचा पोटशूळ कमी झाला नाही. या वृत्तपत्राने सातत्याने भारताला कमी लेखले. भारताची लष्करी ताकद चीनपेक्षा कमी असल्याने सांगत या वृत्तपत्राने चिनी नागरिकांचा आत्मविश्वास टिकवून ठेवण्याचे काम केले. विशेष म्हणजे या वृत्तपत्राने लष्करी सामर्थ्याचे व्हिडिओ प्रसारित करून युद्धाची किती खुमखुमी आहे, हे दाखवून दिले. न्यूयॉर्कमधील 'ग्राफिका' या संस्थेने सोशल मीडियाचा वापर करून चीन कशा पद्धतीने अनुकूल जनमत तयार करतो, याविषयीचा अहवाल प्रकाशित केला आहे. चीनच्या भूभागात भारतीय सैनिकांनी घुसखोरी केली, अशा आशयाच्या अनेक फेक न्यूज चीनमध्ये व्हायरल केल्या जातात. भारताविषयी चिनी लोकांच्या मनात चीड निर्माण व्हावी, असा यामागचा हेतू आहे. खोटी, चुकीची तसेच दिशाभूल करणारी माहिती देऊन चीनमध्ये सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात गैरवापर सुरू आहे. भारत आणि चीन या दोन देशांमध्ये झालेल्या १९६२ च्या युद्धातील काही छायाचित्रे, चित्रफिती तेथील सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. या चित्रफितींतून भारताला पुन्हा आम्ही चीतपट करू, असा संदेश देण्यात येत आहे. चीनची साम्राज्यवादी युद्धखोरी यातून पाहायला मिळते. छायाचित्रांमध्ये भेसळ करून आपल्या सोईची माहिती चीन सोशल मीडियातून पुढे पाठवत आहे.

नियोजनबद्ध पद्धतीने युद्धज्वर निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. सीमेवर झालेल्या चकमकीत चीनचे सैनिकही मारले गेले; परंतु चीनच्या माध्यमांनी आकड्यांची लपवाछपवी केली. वस्तुनिष्ठ माहिती तेथील नागरिकांसमोर आली नाही. चीनमधील मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे, सोशल मीडिया आणि सरकारच्या हवाल्याने देण्यात आलेल्या माहितीमध्ये सातत्याने भारताच्या विरोधात जनचेतना भडकत राहतील, असाच सूर राहिला. चकमकीत भारताबरोबरच चीनची हानी झाली; परंतु किती सैनिक मारले गेले, याविषयी अधिकृत माहिती दिली गेली नाही. माहिती दडपण्यावर चीनचा भर आहे; पण भारताच्या विरोधातील माहिती मात्र टोकदार पद्धतीने जगासमोर येईल, अशी व्यवस्था करण्यात येते. सातत्याने भारताविषयी नकारात्मक, कमीपणा आणणारी आणि दिशाभूल करणारी माहिती देण्यातच चीनची सर्व माध्यमे धन्यता मानत आहेत. चीनमध्ये माध्यम स्वातंत्र्याचा संकोच होत असल्याने माहितीच्या सत्यतेविषयी मोठे प्रश्नचिन्ह आहे. सरकार पुरस्कृत माहिती म्हणजेच बातमी अशी धारणा असेल तर वेगळी अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही. कोरोनामुळे चीन सध्या जगाच्या रडारवर आहे. अमेरिकेसह अनेक मोठ्या राष्ट्रांनी चीनला कोरोनाच्या मुद्यावरून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे; परंतु त्यांना दाद न देता चीनने आपला हेका कायम ठेवला आहे. संपूर्ण जगावर हे संकट घोंगावत असताना चीन मात्र आपली अघोरी साम्राज्यवादी लालसा पूर्ण करण्यासाठी पूर्ण ताकदीने उतरला आहे. भारताविरोधात चीनने आघाडी उघडून तेथील नागरिकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न चालवला आहे. सरकारी माध्यमांसह सर्व प्रकारच्या सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचा वापर करून चीनने भारताच्या विरोधात डिजिटल विश्वातील युद्ध पुकारल्याचे सध्याचे चित्र आहे.

**सहायक प्राध्यापक, वृत्तपत्र व संवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**संपर्क : ९८८११९१२२९**

# अवकाश संशोधन केंद्राला आर. व्ही. भोसले यांचे नाव द्या

## युवासेनेची मागणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये तारांगण व विज्ञान केंद्र स्थापन करा व पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राला ज्येष्ठ अवकाश संशोधक आर. व्ही. भोसले यांचे नाव द्या, अशी मागणी युवासेनेने शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडे केली. याबाबतचे निवेदन प्रभारी कुलगुरूंकडे देण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, कोल्हापूरचे भूमिपुत्र आर. व्ही. भोसले यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनी देशातील पहिल्या रेडिओ टेलिस्कोपची निर्मिती केली होती. त्याचबरोबर अवकाश संशोधन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राच्या स्थापनेमध्येही त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यामुळे या केंद्राला त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याची दखल घ्यावी, तसेच शिवाजी विद्यापीठमध्येही या अवकाश संशोधन क्षेत्राची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तारांगण व विज्ञान केंद्र सुरू करावे, अशी मागणी प्रभारी कुलगुरू नितीन करमळकर यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख मंजित माने, उपशहरप्रमुख शेखर बारटक्के, सनराज शिंदे, शेखर, आयटी सेलप्रमुख चैतन्य अष्टेकर, विभागप्रमुख वैभव जाधव, अवदेश करंबे, सामाजिक कार्यकर्ते विजय दरवान आदी उपस्थित होते.